



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.६ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनामुळे समाजात अस्पृश्यता व भेदभावाच्या विरोधात सुधारणा- राज्यपाल सी. पी राधाकृष्णन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ मुंबई**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, समाजसुधारक आणि राजकीय दूरदृष्टी असलेले एक उत्तुंग व्यक्तीमत्व होते. त्यांनी राष्ट्रासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दृष्टी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाची होती. त्यांच्या दृष्टिकोनामुळेच भारतीय समाजातील अस्पृश्यता आणि भेदभावाच्या विरोधात महत्वपूर्ण सुधारणा घडल्या असल्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सांगितले.







दादर येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राज्यपाल श्री. राधाकृष्णन संबोधीत करीत होते.

कार्यक्रमास व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, राजकुमार बडोले, मंगलप्रभात लोढा, दीपक केसरकर, संजय बनसोडे, कालिदास कोळंबकर, अमोल मिटकरी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी खासदार सर्वश्री नरेंद्र जाधव, राहुल शेवाळे, अमर साबळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, बाबासाहेब जातीयवादापासून मुक्त राष्ट्र पाहू इच्छित होते, जिथे प्रत्येक व्यक्तीला शिक्षण आणि विकासाची समान संधी मिळेल. दारिद्र्य, असमानता यांचे समूळ उच्चाटन करण्याचे सामर्थ्य केवळ शिक्षणात आहे, हे आपण जाणतो. शिक्षणाच्या विचारांना बळ देणाऱ्या डॉ. आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक देशभरातील विद्यार्थी, तरुण आणि नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रातूनच नव्हे, तर भारतातील विविध राज्यांतूनही अनुयायी येतात. त्यांचे अतूट प्रेम, आदर आणि शिस्तबद्ध आचरण खरोखरच प्रेरणादायी आहे.

**देशाच्या प्रगतीचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाला**


सध्या भारत जगात पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहे. आपला देश सध्या विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती करीत आहे. या प्रगतीचे श्रेय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाला आहे, असे प्रतिपादन करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन केले.

## अखेर ठरलेच; दुकानांवर मराठी पाट्या नसतील तर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महापालिकेने शहरातील दुकाने आणि आस्थापनांवर मराठी देवनागरी लिपित ठळक अक्षरात नामफलक लावणे बंधनकारक केले आहे. असे नामफलक नसलेल्या दुकाने आणि आस्थापनांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

शहरातील दुकाने आणि आस्थापनांवर मराठी देवनागरी लिपित ठळक अक्षरात नामफलक लावण्याचे निर्देश महानगरपालिकेने संबंधितांना दिले आहेत.महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ च्या तरतुदींनुसार आस्थापनांचे नामफलक मराठी देवनागरी लिपित ठळक अक्षरात असणे बंधनकारक आहे. दुकाने आणि आस्थापना यांच्या नामफलकावर प्रथमदर्शनी अर्थात सुरुवातीला मराठी भाषेत देवनागरी लिपीत नाव लिहिणे आवश्यक आहे. तसेच इतर कोणत्या भाषेत देखील नाव लिहिले जाणार असेल, तर त्या भाषेच्या तुलनेत मराठीतील नाव हे मोठ्या अक्षरातच असले पाहिजे.सरकारदप्तरी व राज्यभरातील विविध आस्थापनांच्या नामफलकांवरील इंग्रजीचे वाढते अवडंबर लक्षात घेत राज्य सरकारने मराठी सक्तीसाठी आतापर्यंत तब्बल नऊ वेळा कायदे करून परिपत्रके काढली. परंतु, त्यांचीही अंमलबजावणी होत नसल्यामुळे तक्रारदारांनी उच्च न्यायालय



आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत मराठीच्या सक्तीसाठी याचिका दाखल केल्या. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने राज्यात मराठी फलकांसाठी सर्व आस्थापनांना २५ नोव्हेंबर २०२३ पर्यंतची मुदत दिली होती.शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांसह बाजारपेठांमध्येदेखील अजूनही इंग्रजी फलकांचेच वर्चस्व दिसून येत असताना महापालिका प्रशासन अद्यापही अंधारातच असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, मराठी फलकांबाबत राजकीय पक्षांमध्येही अनास्था दिसून येत आहे.

> महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अन्वये प्रत्येक आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपीत असावा आणि तो प्रारंभी लिहणे आवश्यक आहे. तसेच मराठी भाषेतील नामफलकावरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये. आपले व्यवसाय परवाना नवीन किंवा नूतनीकरण करण्यात यावे अन्यथा कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त, अमरावती महापालिका.**

राज्य सरकारने सन २०११ मध्ये मराठी भाषा सक्तीची केली आहे. त्यानंतर सुधारित आदेश सन २०१५ मध्ये काढताना इंग्रजीतील फलक मराठीत करण्याचे बंधन कायद्याने घातले आहे. मुंबई, ठाणे या शहरांमध्ये बहुतांश ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी झाली असली, तरी अमरावती महापालिका क्षेत्रात मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. मराठीच्या सक्तीसाठी अनेक कायदे असतानाही त्याच्या अंमलबजावणीकडे यंत्रणांनी केवळ कागदी घोडे नाचविल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## नाना पटोलेंचा मोठा दावा; म्हणाले, आम्हाला शपथविधीला बोलवले असते तर आलो असतो...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ मुंबई**

भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस हे राज्याचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. त्यांच्या शपथविधीला उद्धव ठाकरे, शरद पवार यांना बोलविण्यात आले होते. परंतू ते आले नाहीत, यावरून भाजपाने २०१९ ला फडणवीस सगळे विसरून ठाकरेंच्या शपथविधीला आले होते असे म्हणत कोत्या मनाची मानसिकता अशी टीका केली आहे. यातच आता नाना पटोले यांनी मोठा दावा केला आहे.

आम्हाला शपथविधीसाठी बोलावलं असतं तर गेलो असतो. निरोप कोणाला दिला याची माहिती नाही. निरोप असता तर गेलो असतो, असे पटोले म्हणाले. तसेच आम्हाला कधीच बोलावले नाही असे सांगत माझे मित्र सीएम झाले त्यांना शुभेच्छा आहेत. आता महाराष्ट्राच्या समस्या दूर व्हाव्यात अशी अपेक्षा आहे, असे पटोले म्हणाले.

कंत्राटी भरती आम्ही बंद करू, असे फडणवीस म्हणाले होते. आता शिक्षकांची कंत्राटी भरती त्यांनी थांबवावी आणि नियमित शिक्षक भरती करावी. ग्रामीण भागात बस जात नाही. ग्रामीण भागात एसटी सेवा बंद करत आहे का? असा प्रश्न पडला आहे. शेतकऱ्यांची कर्ज माफी करावी, धान, सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. राज्याची कायदा सुव्यवस्था सुधारावी, फडणवीस यांना गृह विभागाचा मोठा अनुभव आहे, गृह विभाग त्यांच्याकडेच राहील अशी आमची अपेक्षा आहे, महाराष्ट्र ड्रग मुक्त करावे, अशी मागणी पटोले यांनी केली.

शपथविधीची तारीख राज्यपाल जाहीर करतात.



मात्र यावेळेला यांनीच घोषणा केली, भाजप आणि त्यांचे सोबती हे संविधानापलीकडचे लोक आहेत असा टोला पटोले यांनी लगावला. महायुतीच्या भांडणात आम्हाला जायचे नाही, महाराष्ट्राच्या जनतेच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्या हे आमचे उद्दिष्ट आहे. काहींचे चेहरे हसरे आहेत, काहींचे चेहरे पडले आहेत. ईव्हीएम विरोधातला आवाज जनतेचा आहे, पक्षांचा नाही. आता संपूर्ण देशात ईव्हीएचा घोळ चर्चेचा विषय झाला आहे. मारकरवाडीने सरकारच्या मनात लपलेला मतं चोरणारा डाकू सर्वांसमोर आणला आहे, अशी टीका पटोले यांनी केली.

काँग्रेस गट नेता, प्रतोद निवडीवर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या आधी आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे आमचे पत्र देणार आहोत. ही आमची परंपरा आहे आणि आता जे सत्तापक्षावर बसले आहे, त्यांचे तरी निर्णय कुठे झाले आहेत? एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे स्वतंत्र पक्ष होते पण त्यांचा निर्णय कुठे झाला आहे, असा सवाल पटोले यांनी केला.

## गायब झालेली थंडी पुन्हा येणार? हवामान विभागाने काय वर्तवला नवा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६पुणे**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळे राज्यातील ७ डिसेंबरपर्यंत हवामान ढगाळ राहणार आहे, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आलीये. मात्र राज्यातील थंडी गायब झाली होती. मात्र राज्यातून गायब झालेली थंडी पुन्हा परत येणार आहे.



पुणे शहरासह जिल्ह्यात वाढलेल्या किमान तापमानात पुढील दोन दिवसांत एक ते दोन अंशाने घट होईल. त्यामुळे पुढील आठवड्यात पुन्हा गायब झालेली थंडीला सुरवात होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे. काल शहरातील किमान तापमान १८ तर कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस इतके होते. राज्यात चक्रीवादळामुळे झालेल्या हवामान बदलामुळे मध्य महाराष्ट्र, कोकण-गोवा आणि मराठवड्यातील काही भागात अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे कमाल व किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आणि थंडी गायब झाली.

पुढील २४ तासांत दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली. त्यानंतर हवामान कोरडे राहील, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. दरम्यान, पुणे शहरासह जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे हुडहुडी भरणारी थंडी गायब झाली. ढगाळ वातावरणामुळे ८ अंशावरील किमान तापमान २० अंशाच्या पुढे गेले. तर २५ अंशापर्यंत खाली आलेले कमाल तापमान ३२ अंशाच्या पुढे गेले. त्यामुळे मागील तीन ते चार दिवसांपासून उकाडा वाढला.

## राज्यातील ९५ विधानसभा मतदारसंघात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्स तपासणीसाठी अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

राज्यातील ३१ जिल्ह्यांतील एकूण ९५ विधानसभा मतदारसंघात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात एकूण १०४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. या १०४ अर्जांमधून महाराष्ट्र राज्यातील १,००, ४८६ मतदानकेंद्रापैकी ७५५ मतदानकेंद्रावरील ईव्हीएम संचाची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. राज्यातील उर्वरित सिंधुदुर्ग, नंदुरबार, अमरावती, वर्धा व गडचिरोली या ५ जिल्हयात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भातील अर्ज प्राप्त झाले नाहीत.

## न भूतो, न भविष्यती...! विधानसभेत सख्ख्या भावांच्या दोन जोड्या दिसणार; असा योगायोग की...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ मुंबई १९**

यंदाची विधानसभा खूप खास ठरली आहे. सख्ख्या भावांच्या दोन जोड्या विधानसभेत जाणार आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात ही पहिलीच वेळ असणार आहे. ही किमया केली आहे कोकणातील राणे बंधू आणि सामंत बंधुंनी. आणखी एक योगायोगाची बाब म्हणजे चौघांचेही मतदारसंघ एकमेकांना लागून सलग आहेत. असा विक्रम मोडणे नजीकच्या काळातच नाही तर पुढची अनेक वर्षे कोणाला शक्य होणार नाही.

शिवसेनेकडून उदय सामंत हे रत्नागिरी मतदारसंघ, किरण सामंत त्याच्या पुढचा राजापूर मतदारसंघातून निवडून आले आहेत. तर भाजपाकडून नारायण राणेंचे पुत्र नितेश राणे कणकवली आणि कुडाळ-मालवण मतदारसंघ शिवसेनेकडे असल्याने त्या पक्षात जात निलेश राणे निवडून आले




आहेत. हे चारही मतदारसंघ एकमेकांना लागून आहेत. या चौघांपैकी मंत्रिपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याचीही चर्चा सुरु झाली आहे.

भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादीचे मंत्रिपदांचे वाटप लवकरच होणार आहे. या वाटपात भाजपाला २२, शिवसेनेला १३ तर राष्ट्रवादीला १२ अशी खाती वाटली जाणार असल्याचे समजते आहे. येत्या काही दिवसांत हे चित्र स्पष्ट होणार आहे. असे असले तरी शिंदे गटातून सावंतवाडीचे आमदार दिपक केसरकर हे मंत्रिपदाचे प्रबळ दावेदार आहेत. यामुळे या चार भावांपैकी कोणाला मंत्रिपद मिळणार याकडेही सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी वासियांचे लक्ष लागले आहे.

तिसऱ्यांदा आमदार झालेले नितेश राणे देखील मंत्रिपदाच्या स्पर्धेत आहेत. ते भाजपाचे असल्याने भाजपाच्या कोट्यातून त्यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. तर रत्नागिरीचे आमदार उदय सामंत हे शिवसेनेतून मंत्रिपदाचे दावेदार आहेत. नितेश राणे हे नारायण राणेंचा पराभव करणाऱ्या वैभव नाईकांना पाणी पाजून विधानसभेत पहिल्यांदाच पोहोचले आहेत. त्यापूर्वी ते काँग्रेसचे खासदार होते. पहिलीच टर्म असल्याने निलेश राणेंऐवजी नितेश राणेंना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. तसेच सामंत बंधूंमध्येही होण्याची शक्यता आहे.

उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत यांचीही आमदारकीची ही पहिलीच टर्म आहे. तर उदय सामंत यांनी ठाकरे आणि शिंदे या दोघांच्याही सरकारमध्ये मंत्रिपद भूषविलेले आहे. यामुळे सामंत बंधुमध्येही धाकट्यालाच मंत्रिपद मिळण्याची दाट शक्यता आहे. निलेश राणे हे ज्येष्ठ तर नितेश राणे हे धाकटे आहेत. तर सामंत बंधूमध्ये किरण सामंत ज्येष्ठ व उदय सामंत धाकटे आहेत. कोकण पट्ट्यात जर केसरकर, राणे आणि सामंत यांना मंत्रिपदे मिळाली तर तळकोकणात सत्तेची ताकद एकवटण्याची शक्यता आहे. यामुळे चिपळूनपासून ते रायगडपर्यंत मंत्रिपद देऊन शिवसेना, भाजपाला बॅलन्स साधावा लागणार आहे. एनसीपीच्या आदिती तटकरे या भागातून महायुतीच्या मंत्री असण्याची शक्यता आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने आणि बहुक्षेत्रीय कार्याने भारतीय माणसाच्या जीवनाच्या विविध क्षेत्रांत संधींचा उदय झाला. माणसाला माणुसकीने वागविले गेले पाहिजे, यासाठी त्यांनी अनेक लढे उभारले. दलित, शोषित, स्त्रिया, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त, आलुतेदार, बलुतेदार यांच्या हक्कासाठी त्यांनी वेळोवेळी बुद्धिकौशल्याचा वापर करून लढा दिला.

सामाजिक समतेसाठी, विषमतेविरुद्ध आणि सामाजिक न्यायासाठी अन्यायाविरुद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण समजून घेतले पाहिजे. शतकानुशतके वंचित असलेल्या समाजाला अस्मितेची ओळख देण्याचे आणि त्याचबरोबर समतेवर आधारित नवसमाजाचे स्वप्न पाहण्याचे आत्मभान भारतीय समाजाला त्यांच्यामुळेच निर्माण झाले. समाज परिवर्तनासाठी चाललेल्या सामाजिक युद्धाचे ते महानायक होते. भारतातील समाजव्यवस्था सर्वंकष बदलून नवीन व्यवस्था देशाला देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर जीवाचे रान केले. फक्त दलित, शोषितच नव्हे, तर अखिल मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव साजरा केला जात असताना संविधानाच्या या महान शिल्पकाराचे कार्य व विचार समजून घेणे महत्त्वाचे आहे. ९ डिसेंबर १९४६ पासून भारताचे संविधान तयार करण्याचे काम संविधान सभेने सुरू केले. पहिल्या

## संपादकीय ......

# महामानव डॉ. आंबेडकर : सामाजिक समतेचे महानायक

दिवशीच २९६ सदस्यांऐवजी २०७ सदस्य उपस्थित राहिले. मुस्लिम लीगच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. १३ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय संविधानाच्या 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला. मुस्लिम लीगचा कामकाजावर बहिष्कार व संस्थानिकांनी सहभाग न घेतल्याने डॉ. एम. आर. जयकर यांनी या ठरावाला हरकत घेऊन तो प्रलंबित ठेवण्याची मागणी केली. काही सदस्य बोलल्यानंतर अशा तणावाच्या वातावरणात अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी डॉ. आंबेडकर यांना आपले विचार मांडण्यासाठी निमंत्रित केले. हे त्यांचे संविधान सभेतील पहिलेच भाषण होते. ते बोलायला उभे राहिले तेव्हा सभागृहात कमालीची स्तब्धता पसरली. प्रत्येकाला वाटत होते ते आता डॉ. जयकरांच्या बाजूने व काँग्रेसच्या विरोधी भूमिका घेऊन विचार मांडणार. काही काँग्रेस सदस्यांनी त्यांच्या भाषणात अडथळे आणण्याचे मनसुबे रचले होते; परंतु त्यांनी आपल्या ऐतिहासिक व राष्ट्रवादाने ओतप्रोत भरलेल्या भाषणाने सर्वांना आश्चर्यचकित केले. त्यांचे हे भाषण ऐकून संपूर्ण संविधान सभा मंत्रमुग्ध झाली. हे भाषण संपताच सभागृहात प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला.

या भाषणात ते म्हणतात, मला या महान देशाची सामाजिक, राजकीय, आर्थिक पुनर्रचना करण्याबाबत वा या देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेला अंतिम स्वरूप देण्याबद्दल शंका नाही. मला आता हे पटले आहे की, पुढील काळात हा देश एकसंध होण्यास कुणीही रोखू शकणार नाही. आपल्या देशात कितीही जाती व पंथ असले, तरी मला आता शंका नाही की, आपण यापुढे एकसंध लोक असू. या मुद्द्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, डॉ. बी. आर. आंबेडकर, के. एम. मुन्शी, सय्यद मोहम्मद सादुल्लाह, बी. एल. मित्तर व डी. पी. खैतान या सदस्यांची मसुदा समितीवर निवड करण्यात आली. या समितीने डॉ. आंबेडकरांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड केली. मसुदा समितीने १४१ दिवसांत काम पूर्ण केले. अवघ्या सहा महिन्यांत घटनेचा मसुदा तयार झाला. त्यानंतर तो जनतेच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला. जनतेकडून त्याबाबत एकूण ७,६३५ सूचना प्राप्त झाल्या. समितीने त्यावर विचार विनिमय करून त्यातील २,४७३ सूचना चर्चेसाठी स्वीकारण्यात आल्या. संविधान सभेत संविधानाच्या मसुद्याचे वाचन करून, त्यावर चर्चा करून, दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यातील काही स्वीकारण्यात आल्या, तर काही फेटाळण्यात आल्या. संविधानाचा मसुदा चर्चेसाठी संविधान सभेत ठेवला असतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ नोव्हेंबर १९४८ रोजी केलेल्या आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणात भारतीय संविधानाच्या मूलभूत सिद्धांताचे विवेचन केले. डॉ. पंजाबराव देशमुख याबद्दल म्हणतात, माझे सन्माननीय मित्र डॉ. आंबेडकर यांनी केलेले मसुद्यावरील भाषण उत्कृष्ट व अत्यंत प्रभावी होते. १५ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेसमोर संविधानाचा मसुदा मांडला. यावेळी त्यांनी संविधानाची तत्त्वे, प्रकार, वैशिष्ट्ये, राज्यपद्धती अशा मूलभूत मुद्द्यांबाबत जगातील विविध देशांच्या संविधानाची उदाहरणे देऊन तौलनिक विवेचन केले. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राष्ट्रनिर्मितीची मूलतत्त्वे स्पष्ट करणारे भाषण डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेत केले. राष्ट्रनिर्मिती आणि देशाचे व लोकशाहीचे भवितव्य याविषयी त्यांनी जी मांडणी केली, ती देशासाठी अत्यंत मूलभूत स्वरूपाची ठरली आहे. देशापेक्षाही तत्त्वप्रणाली श्रेष्ठ मानण्यात आली, तर पुन्हा एकदा आपल्या देशाचे स्वातंत्र्य गमवावे लागेल आणि ते परत मिळणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. राजकारणात 'एक व्यक्ती–एक मत' व 'एक मत–एक मूल्य' हे तत्त्व मान्य केले आहे. आर्थिक व सामाजिक क्षेत्रात विषम समाजव्यवस्थेमुळे हे तत्त्व

# मका पिकाला पाण्याच्या पाळ्या कशा व किती द्याव्या?




**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

मका हे रब्बी हंगामातील महत्वाचे पीक आहे. सद्यस्थितीत रब्बी हंगामातील मका पिकाची लागवडीसह इतर कामे सुरु आहेत. या पिकाच्या पाणी व्यवस्थापन करताना काळजी घेणे महत्वाचे असते.मका पिकाचे पाणी व्यवस्थापन कसे करावे, हे जाणून घेऊयात...

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

मका पाणी व्यवस्थापन

मका पिकाची रोपावस्था जास्त पाणी किंवा दलदलीच्या स्थितीस खूपच संवेदनशील आहे. म्हणून पेरणीनंतरच्या सूरवातीच्या २० दिवसापर्यंतच्या काळात पिकात पाणी साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

मक्याची पाने रुंद व लांब असतात. बाष्पीभवन क्रियेमुळे पानातून अधिक पाणी बाहेर टाकले जात असल्याने या पिकास पाण्याची गरज अधिक आहे.

मका पिक पाण्याच्या ताणास खूपच संवेदनशील आहे. त्यामुळे खरिप हंगामात पावसात खंड पडून पाण्याचा ताण पडल्यास पिकाच्या महत्वाच्या अवस्थांच्या काळात संरक्षित पाणी द्यावे.

पाण्याची एकूण गरज ४० ४५ (सें. मी.) असून पाण्याच्या एकूण ४ पाळ्या लागतात.

रब्बी हंगामात जमिनीच्या मगदुरानुसार १०-१२ दिवसाच्या अंतराने, तर उन्हाळी हंगामात ८-१० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.

मका पिकास ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन उत्पादनात वाढ होते. खरीप हंगामात निश्चित आणि विस्तृतपणे पावसाची विखरण असणाऱ्या भागात जिरायती मका पिक येते.

**पाण्यासाठी संवेदनशील अवस्था**

१. रोप अवस्था : २५-३० दिवसांनी

२. तुरा बाहेर पडताना : ४५-५० दिवसांनी

३. फुलोऱ्यात असताना : ६० – ६५ दिवसांनी

४. दाणे भरणेचेवेळी : ७५-८० दिवसांनी




# चाकवताची भाजी खाण्याचे जबरदस्त फायदे जाणून घ्या

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक –** आपल्या प्राचीन वैद्यकीय पद्धतीत आयुर्वेदात या भाजीला विशेष महत्व आहे. या भाजीचे पाने कात्री सारखे असतात. हरभरा, मेथी आणि पालक सोबत चाकवतची भाजी अनेक रोगांवर उपचार करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. हिवाळ्यात या हिरव्या भाज्यांची मागणी वाढते. विशेष म्हणजे तुम्ही तुमच्या इच्छेनुसार या भाजीचा आहारात समावेश करू शकता. रायता बनवा, पराठा किंवा तुमच्या आवडत्या डाळीत घालून खा.



**पोषक घटक**तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की १००ग्रॅम हिरव्या भाज्यांमध्ये ४ ग्रॅम प्रोटीन, ७ ग्रॅम कार्बोहायड्रेट आणि ०.८ ग्रॅम फॅट असते. चाकवताच्या भाजीत जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने, फायबर, अँटिऑक्सिडंट्स, ओमेगा -३ फॅटी ॲसिडस् आणि पाणी असते त्यामुळे हे शरीरात निर्जलीकरण होऊ देत नाही.

**चाकवताची खाण्याचे फायदे –** हिवाळ्यात रिकाम्या पोटी राहू नये असे आयुर्वेदात सांगितले आहे. हिवाळ्यात भूक जास्त लागते त्यामुळे लोक भरपूर जेवतात आणि नंतर वजन वाढल्याची तक्रार करतात असे अनेकदा पाहायला मिळते. त्यामुळे चाकवतची भाजी या चिंतेतून दिलासा देते. या भाजीत फायबर असल्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते आणि पोटही भरल्या सारखे वाटते. हिवाळ्यात ही भाजी खाल्याने वजन नियंत्रणात राहते.

या भाजीमध्ये भरपूर फायबर असल्यामुळे आतड्यांमध्ये साचलेली घाण देखील साफ करते. या भाजीत पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने शरीर हायड्रेट राहते आणि पचनक्रियाही चांगली राहते. या भाजीमध्ये भरपूर फायबर आणि पाणी असल्यामुळे बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि इतर पाचन समस्या दूर होते. केसांची वाढ होण्यासाठी आणि शरीरातील पेशी वाढण्यासाठी चाकवतची भाजी नक्की खावी.या पालेभाज्या गुणांनी समृद्ध असतात आणि त्यात कॅल्शियम आणि फॉस्फरस देखील असतात जे हाडे मजबूत करतात. या भाज्या खाल्याने हाडे आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो. या भाजीचा १०० मिली रस रोज प्यायल्यास यकृत निरोगी होते आणि महिनाभर सतत सेवन केल्यास हिमोग्लोबिनही वाढते. त्यामुळेही भाजी आठवड्यातून दोनदा तरी खावी.

# देवेंद्रपर्वास प्रारंभ !



महाराष्ट्रातील सत्तास्थापनेचा तिढा सुटला असल्यामुळे कोट्यवधी जनतेने सुस्कारा सोडला आहे. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार विराजमान होणार असून, महाराष्ट्राचा राज्यशकट एका अनुभवी व कार्यक्षम अशा विकासपुरुषाच्या हातात येणार आहे. लोकसभा निवडणुकांत भाजपला आणि पर्यायाने महायुतीला फटका बसल्यानंतर त्याची जबाबदारी स्वीकारून फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊ केला आणि पक्ष संघटनेत काम करण्याची तयारी दर्शवली होती; पण संघाचे बाळकडू मिळाल्यामुळे स्वतःपेक्षा पक्ष मोठा आणि पक्षापेक्षा देश मोठा हे संस्कार फडणवीस यांच्यावर झाले आहेत. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यास भाजपच्या पक्षनेतृत्वाने साहजिकच नकार दिला. त्यानंतर पक्षादेश प्रमाण मानून फडणवीस यांनी महाविकास आघाडीने तयार केलेले 'नॅरेटिव्ह' पुसून टाकण्याचा चंगच बांधला. भाजप हा पक्ष संविधानविरोधी नसून उलट घटनेशी एकनिष्ठ आहे. काँग्रेसनेच देशावर राज्य करताना वारंवार घटनेचा अपमान केला होता. काँग्रेस नेते राहुल गांधी विदेशात जाऊन शोषित-वंचितांना दिलेल्या आरक्षणाच्या विरोधात वक्तव्ये करत आहेत, याकडे फडणवीस यांनी सामान्य जनतेचे लक्ष वेधले. त्यामुळे अर्थातच मविआ आघाडीचे संविधानाबाबतचे नॅरेटिव्ह विधानसभा निवडणूक प्रचारात अयशस्वी ठरले. फडणवीसांनी सरकारला अनेक कल्पक योजना सुचवल्या आणि त्याचा महायुतीला निवडणुकीत चांगलाच फायदा मिळाला. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुस्लिम मौलवी सज्जाद नोमानी यांनी भाजपविरोधात 'व्होट जिहाद' करण्याचे आवाहन केले होते. त्यावर फडणवीस यांनी तिखट हल्ला चढवला. त्यामुळे मविआ आघाडीला बचावात्मक पवित्र्यात जावे लागले. विधानसभा निवडणूक निकालानंतर नोमानी यांना बिनशर्त माफी मागावी लागली. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवरून भाजपवर टीका करणार्यांनी नोमानींबाबत मात्र मौन धारण का केले आहे, असा रोखठोक सवाल फडणवीस करत होते आणि त्यांचा हा युक्तिवाद प्रभावी ठरला. महायुतीला जे विक्रमी यश मिळाले, त्यामध्ये फडणवीस यांचा सिंहाचा वाटा होता. योग्य व्यक्तींना तिकिटांचे वाटप करणे, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार) यशस्वी पद्धतीने जागा वाटपाची बोलणी करणे आणि या दोन पक्षांच्या चिन्हांवर भाजपचे काही उमेदवार उभे करणे, हे सर्व फडणवीस यांनी विचारपूर्वक पार पाडले. प्रचारातील मुद्दे जनतेला आकर्षित करून घेतील अशा प्रकारचे असतील, याची दक्षता त्यांनी घेतली. मविआमधील अंतर्गत मतभेद वारंवार प्रकट होत असताना महायुतीत 'एक हैं तो सेफ हैं'चे वातावरण त्यांनी ठेवले. वास्तविक भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्यामुळे मुख्यमंत्री भाजपचा होणार आणि त्यावर फडणवीस यांचाच रास्त दावा असणार, हे स्पष्ट होते; पण फडणवीस यांनी त्याबद्दल एक शब्दही न बोलणे पसंत केले. तसेच कोणत्याही प्रकारचे लॉबिंग केले नाही. मुख्यमंत्रिपदासाठी फडणवीस यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे टाळले. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा संधी द्यावी, अशी शिवसेनेची इच्छा असणे स्वाभाविक होते. गृह व अन्य खात्यांसाठी शिवसेनेने बरेच ताणूनही धरले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत प्राथमिक बैठक झाली आणि त्यानंतर मुंबईत लगेचच वाटाघाटी होऊन तोडगा निघेल, अशी अपेक्षा होती; पण शिंदे यांचे आजारपण, मतमतांतरे यामुळे अंतिम निर्णय होण्यास वेळ लागला; पण शेवटी शिवसेनेने आपली भूमिका मवाळ केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर फडणवीस यांच्या नावाला आधीच पाठिंबा देऊन टाकला होता. बुधवारी भाजपच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत फडणवीस यांच्या नावावर विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. भाजपमधील शिस्त आणि एकता हे गुण काँग्रेससारख्या पक्षानेही घेण्यासारखे आहेत. आता मंत्रिमंडळात कलंकित प्रतिमेचे नेते नकोत, याबद्दल भाजपने आग्रही भूमिका घेतली असून, याचे स्वागतच केले पाहिजे.

वादग्रस्त व्यक्तिमत्त्वाच्या एखाद्या नेत्यास मंत्रिमंडळात घ्यावेच लागल्यास त्यास भावी मुख्यमंत्री फडणवीस यांना लगाम घालवाच लागेल. तसेच आमदार नितेश व नीलेश राणे यांनाही बोलताना संयम पाळण्यास सांगावे लागेल. फडणवीस यांनी स्वतःसमोर वडील गंगाधर फडणवीस यांचा आदर्श ठेवला आहे. गंगाधरपंतांनी आणीबाणीत सरकारविरोधी निदर्शनात भाग घेऊन कारावास भोगला होता. देवेंद्र यांनीही रामजन्मभूमी आंदोलनात भाग घेऊन बदायूँ येथे तुरुंगवास भोगला आहे. फडणवीस हे कायद्याचे विद्यार्थी असून, याखेरीज व्यवसाय व्यवस्थापनातील पदवीधर आहेत. फडणवीस यांनी महापौरपद समर्थपणे सांभाळले आणि विधानसभेमध्ये पहिल्यापासूनच आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांद्वारे ओळख निर्माण केली. तरुण मुख्यमंत्री म्हणून संधी मिळाल्यानंतर मुंबईतील मेट्रोचा विस्तार, जलयुक्त शिवार योजना, समृद्धी महामार्ग असे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी यशस्वीपणे राबवून दाखवले. वसंतराव नाईक यांच्यानंतर सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेले फडणवीस एकमेवच; मात्र सत्ता गेल्यानंतर अनेक काँग्रेसवाले तळमळत असतात; परंतु विरोधी पक्षनेते म्हणूनदेखील फडणवीस यांनी आपली तडफ दाखवली आणि महाविकास आघाडी सरकारच्या भ- ष्टाचाराचा पर्दाफाश केला. कोरोना काळातील मुंबई महानगरपालिकेचा गैरकारभार त्यांनी लोकांसमोर आणला. उद्धव ठाकरे सरकारला नामोहरम करून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट घडवून आणून, शिंदे यांना मुख्यमंत्री बसवण्यात फडणवीस यांची चाणक्यनीती दिसून आली. पक्षनेतृत्वाच्या आदेशानुसार उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास त्यांनी कमीपणा मानला नाही. प्रामाणिकपणा, कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर फडणवीस यांनी 'मैं समंदर हूँ, लौटकर आऊँगा' हे विधानसभेत ऐकवलेले शब्द त्यांनी खरे करून दाखवले आहेत. चक्रव्यूहातून बाहेर आलेले फडणवीस हे आधुनिक काळातील अभिमन्यूच आहेत. आता पुणे, मुंबई, नाशिक, नागपूरच्या पलीकडचा विचार करून राज्याच्या मागास भागांना ते विकासाच्या प्रवाहात आणतील, अशी आशा आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज सादर करण्यास १६ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या शासकीय वसतिगृहात प्रवेश आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शासनाच्या https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन करण्यात आलेली आहेत.

शैक्षणिक संस्थामध्ये काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीया अद्यापही सुरु आहेत. ही बाब लक्षात घेवून विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे पोर्टलवर ऑनलाईन अर्ज स्विकारण्यास दि. १६ डिसेंबर २०२४ पर्यंत यापुर्वी मुदतवाढ देण्यात आली आहे.अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे दिलेल्या मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत आणि या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचे पुन्हा नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. मात्र ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी स्वाधार योजनेचा लाभ घेतला असुन अभ्यासक्रमांच्या पुढच्या वर्षासाठी अशा विद्यार्थ्यांना सुध्दा संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.




विद्यार्थ्यांचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र, सद्यस्थितीत स्वाधार योजनेचा लाभ घेत असलेले विद्यार्थी तसेच नव्याने स्वाधार योजनेसाठी अर्ज करणारे विद्यार्थी यांना संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करतांना तांत्रिक अडचणी येत आहेत. काही विद्यार्थी संघटना आणि क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी यांनी या योजनेचे अर्ज भरण्यात मुदतवाढ देण्याबाबत आयुक्तालयास मागणी केलेली आहे. या बाबी विचारात घेता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. दिलेल्या वाढीव मुदतीत पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचे अर्ज संकेतस्थळावर ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.तेव्हा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेस पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांनी दि.१६ डिसेंबर, २०२४ पर्यंत या योजनेचे https://hmas.mah ait. org या संकेतस्थळावर ऑन लाईन भरण्यात यावे. असे आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुनिल वारे, यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.–

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ६ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# कधी मिळणार? जिल्हा परिषदेला नियमित अधिकारी

## प्रभारी अधिकाऱ्याविना कामकाज होईना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :-** जिल्हा परिषदेतील अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन, पाणीपुरवठा व स्वच्छता, रोजगार हमी योजना विभागाचे उपमुख्य कार्यकारी यासह अनेक महत्त्वाच्या विभागातील विभाग प्रमुखांचे पदे रिक्त आहे. त्यामुळे या विभागाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांवर चालविला जात आहे. अशातच काही दिवसांपूर्वी शासनाने काही अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने बदल्या केल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाला मराठवाड्यातील एका गटविकास अधिकाऱ्याची पदोन्नतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून शासनाने पोस्टिंग केलेली आहे. मात्र हे साहेब अद्यापही जिल्हा परिषदेत रुजू झालेले नाहीत. त्यामुळे नवीन एचओडी रुजू होण्यापूर्वीच पोस्टिंगमध्ये अंशतः बदलासाठी प्रयत्न करीत असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात रंगत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत एकतर अधिकारी मिळेनात आणि दुसरीकडे प्रभारी अधिकाऱ्याशिवाय कामकाज चालेना अशी स्थिती झेडपीची झालेली आहे.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात विविध प्रकारची विकासात्मक कामे केली जातात. ही कामे करताना या स्थानिक स्वराज्य संस्थेत आज घडीला खातेप्रमुखाच्या रिक्त पदांचा दिवसेंदिवस अनुशेष वाढत चालला आहे. वर्षभरापूर्वीच सामान्य विभागाचे डेप्युटी सीईओंची बदल झाली. त्यापाठोपाठ रोजगार हमी योजना, स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस अगोदरच अतिरिक्त उपमुख्यकार्यकारी अधिकारी संतोष जोशी यांचीदेखील कोल्हापूर जिल्हा परिषदेत बदली झाली आहे. या सगळ्या अधिकाऱ्यांचे बदलीवर इतर ठिकाणी आउट गोइंग झाले असले तरी या अधिकाऱ्यांच्या रिक्त जागेवर नवीन कुठल्याही अधिकाऱ्यांची इनकमिंग झाले नाही. अशातच नुकत्याच विधानसभा निवडणुका आटोपल्या. यानंतर शासनाने गटविकास अधिकारी संवर्गातील काही अधिकाऱ्यांच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदावर पदोन्नती केली.




यामध्ये अनेक ठिकाणी नवीन अधिकाऱ्यांच्या पोस्टिंग केल्यात. परंतु नियुक्तीनंतर नव्याने जीएडीला येणारे अधिकारी आठवडा उलटूनही नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत.

त्यामुळे नवीन येणारे अधिकारी रुजू होणार की सोयीच्या ठिकाणी नियुक्तीसाठी अंशतः बदल करून घेणार याची चर्चा झेडपीत रंगत आहेत.

## श्री स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्रात आयोजन
## श्री दत्त जयंती अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६चांदुर बाजार -** चांदूरबाजार येथील श्री स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) येथे श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताहाचे आयोजन ९ ते १६ डिसेंबर दरम्यान करण्यात आले असून या सप्ताहात श्री गुरुचरित्र महापारायण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ८ डिसेंबर ग्रामदेवता सन्मान, मंडल मांडणी, ९ डिसें. मंडल स्थापना, अग्नीस्थापना, स्थापीत देवता हवन, १० नित्सस्वाहाकार, गणेश डिसें. याग, मनोबोध याग, ११ डिसें. नित्य स्वाहाकार, गीताई याग, १२ डिसें,नित्य स्वाहाकार, स्वामी याग, १३ डिसें. नित्य स्वाहाकार, चंडी याग, १४ डिसें. नित्यस्वाहाकार, मल्हारी याग, रुद्र याग, १५ डिसें. नित्य स्वाहाकार, बली पुणाहुती दु १२ वा. श्रीदत्त जन्मोत्सव, १६ डिसें. श्री सत्यदत्त पुजन, सप्ताह सांगता. १५ डिसें. रोजी दु१२.३९ श्रीदत्त जन्मोत्सव साजरा होणार असुन दुपारी ३ वाजताग्रामप्रदक्षिणाचे आयोजन करण्यात आले आहे.दि.१६ डिसें. रोजी सकाळी १०.३० वा. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताह काळात अखंड श्रीस्वामी समर्थ जप, श्री स्वामी चरीत्र सारामृत पठण, व अखंड विणा वादन होणार आहे.




# नागपूर-मुंबई विमान तिकिटांचे २५ हजारी उड्डाण

## शपथविधीला पोहोचण्यासाठी अनेकांना तिकीटच मिळाले नाही : समृद्धी महामार्गाने शेकडो समर्थक रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर- :** राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा गुरुवारी सायंकाळी पाच वाजता आझाद मैदानावर शपथविधी होणार आहे. या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी अनेकांनी विमानाने मुंबईवारीचा बेत आखला. मात्र, बुधवारी सायंकाळच्या नागपूर-मुंबई विमानाचे तिकीटदर तब्बल २० हजारांवर, तर गुरुवार सकाळच्या विमानाचे तिकीट दर २५ हजारावर पोहोचले. त्यामुळे शेकडो शुभचिंतक बुधवारी सायंकाळनंतर आपल्या चारचाकी वाहनांनी समृद्धी महामार्गाने मुंबईसाठी रवाना झाले. फडणवीस मुख्यमंत्री होणार ही नागपूरकरांसाठी अभिमानाची बाब आहे. फडणवीस यांचा मोठा चाहता वर्ग नागपूरसह विदर्भात आहे. त्यामुळे त्यांच्या शपथविधीला उपस्थित राहण्यासाठी अनेकांनी मुंबईवारीचा बेत आखला. अनेकांनी गुरुवारी सकाळी विमानाने रवाना होण्याचे नियोजन केले. मात्र, बुधवारी सायंकाळपर्यंत गुरुवार सकाळच्या नागपूर-मुंबई विमानाच्या तिकीट दरांनी २० हजार रुपयांचा पल्ला ओलांडला.

इंडिगोचे (जीई ५००२) सकाळी ६:०५ वाजता मुंबईला जाणाऱ्या विमानाचे तिकीट १७ हजार ६६९ रुपयांवर होते, तर इंडिगोच्या सकाळी ८:२५ वाजताच्या विमानाचे तिकीट तब्बल २० हजार ७२० रुपयांवर पोहोचले होते. एअर इंडियाच्या (एआय ६२८) विमानाचे तिकीट सायंकाळी ६ वाजता १६ हजार १६० रुपयांना होते. मात्र, सायंकाळी ७.१५ वाजता हे दर वाढून तब्बल २५ हजार ३४९ रुपयांवर पोहोचले. रात्री उशिरापर्यंत तिकीट दरात हजार-दोन हजार रुपयांचा चढउतार सुरू होता. मात्र, तिकीट दर फारसे कमी झाले नाही. विमान तिकिटांचे वाढलेले दर पाहून अनेकांनी समृद्धी महामार्गाने मुंबई गाठणे पसंत केले. बुधवारी सायंकाळनंतर शेकडो चारचाकी वाहने समृद्धी मार्गाने मुंबईसाठी रवाना झाली.




### ट्रॅव्हल एजन्सींनीही हात वर केले

विमान तिकिटांचे वाढलेले दर पाहून अनेकांनी ट्रॅव्हल एजन्सींशी संपर्क साधला; पण त्यांनीही हात वर केले. नागपूरहून मुंबईला विमानाने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्यामुळे विमान कंपन्यांकडूनच दर वाढविण्यात आले आहेत, असे ट्रॅव्हल एजन्सींकडून सांगण्यात आले.

# बचत गटांच्या योगदानातून साकारले 'तेजस्विनी भवन'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अकोला,** महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत लोकसंचालित साधन केंद्र व बचत गटांतील महिलांच्या योगदानातून अकोला येथे 'तेजस्विनी भवन' साकारण्यात आले असून, या वास्तूचे दि. १० डिसेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजता उद्घाटन होणार आहे.



बचत गटांच्या माध्यमांतून खेडोपाडी विविध व्यवसाय करणाऱ्या महिलीभगिनींच्या कष्ट व योगदानातून शहरातील डाबकी रस्त्यावरील उगलेवाडीत ही वास्तू उभी राहिली आहे. तेजस्विनीभवनाची वास्तू दोनमजली असून, त्यात कार्यालय, प्रशिक्षण सभागृह, वाहनतळ, स्वच्छतागृह आदी सुविधा आहेत. बचत गटाच्या चळवळीतील हा महत्वाचा टप्पा आहे, असे 'माविम'च्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी सांगितले.

अकोला तालुका लोकसंचालित साधन केंद्रातर्फे १ हजार ६०० बचत गट व सुमारे १७ हजार ५०० महिला संघटक कार्यरत आहेत. या सर्व महिलांना उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येते. त्यामुळे अकोला तालुक्यात गावोगाव अनेक छोटे व्यवसाय सुरू झाले. आता तेजस्विनीभवन निर्माण झाल्यामुळे गटांना उत्तम प्रशिक्षणासाठी सभागृहाची सुविधा उपलब्ध झाली आहे, असे लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते यांनी सांगितले. ही वास्तू तीन हजार १०० फुटांच्या क्षेत्रात सुमारे ६५ लक्ष रू. निधीतून उभारण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक मान्यवर उद्घाटन समारंभाला उपस्थित राहतील, असे त्यांनी सांगितले.

# हीच तर महाराष्ट्रविरोधी कोती मनोवृत्ती; भाजपाचा उद्धव ठाकरे-शरद पवारांना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई -** गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेला महायुती सरकारचा शपथविधी सोहळा गुरुवारी आझाद मैदान येथे पार पडला. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह विविध राज्यातील मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि कलाकार मंडळीही सहभागी झाले होते. परंतु या सोहळ्यासाठी विरोधी पक्षातील एकही नेता उपस्थित नव्हता. शपथविधी सोहळ्यासाठी व्यक्तिगत निमंत्रण देऊनही उद्धव ठाकरे, शरद पवार गैरहजर राहिले त्यावरून हीच तर महाराष्टविरोधी कोती मनोवृत्ती अशा शब्दात भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी टोला लगावला आहे. उपाध्ये यांनी ट्विट केलंय की, आझाद मैदानावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार शपथविधी झाला. या समारंभापासून व्यक्तिगत आमंत्रण देऊनही उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस नेते गैरहजर राहिले. हा लोकांनी निवडून दिलेल्या सरकारचा शपथविधी होता. लोकशाहीत लोकांनी दिलेला कौल स्वीकारून हे नेते शपथविधीला आले असते तर खरंच या नेत्यांना महाराष्ट्र हिताची व संविधानाची जाण आहे असा अर्थ निघाला असता. महाराष्ट्राचा विकासासाठी आम्ही एक आहोत असा संदेश दिला गेला असता असं त्यांनी सांगितले.त्याशिवाय २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी लोकांचा विश्वासघात करत मविआसोबत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली तेव्हा त्या कार्यक्रमाला देवेंद्र फडणवीस व तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील उपस्थित होते. त्यापूर्वीची उदाहरणे आहेत. निवडणुका संपल्या आता विकासासाठी आपण एक आहोत हा संदेश देता आला असता. मात्र पक्षीय स्वार्थापलीकडे आम्ही काहीच पाहू शकत नाही, महाराष्ट्राच्या हिताचा कोरड्या गप्पा मारतो व वेळ आली तर विरोधातच हेच या निमित्ताने या मंडळींनी दाखवून दिले असं सांगत भाजपाने २०१९ च्या शपथविधीची आठवण करून दिली.



### देवेंद्र फडणवीसांनी स्वत: केले होते फोन

शपथविधी सोहळ्यासाठी राजशिष्टाचार विभागाकडून विरोधी पक्षातील नेत्यांना आमंत्रण पाठवण्यात आले होते. देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे यांना फोन करून निमंत्रण दिले होते मात्र महाविकास आघाडीचा एकही नेता या सोहळ्याला आला नाही. या नेत्यांनी आपल्याला शुभेच्छा दिल्या पण काही वैयक्तिक कारणांनी ते येऊ शकले नाहीत अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# तुषार भारतीय मित्र परिवाराच्या वतीने शपथविधी निमित्त जल्लोष

## अभिनंदन देवाभाऊ , एकनाथभाई , अजितदादा...!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती -** महाराष्ट्राच्या प्रगतीचा ध्यास आणि करोडो लाडक्या बहिणींचा आशीर्वाद घेऊन कार्य करणारे प्रगतीशील विचारांचे प्रणेते,मार्गदर्शक मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री सोबतच उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब , श्री अजित पवार साहेब म्हणून शपथ घेतली त्याबद्दल आनंद वाटत आहे .

त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासाला नवी उंची मिळेल आणि राज्याच्या हितासाठी असंख्य ऐतिहासिक निर्णय घेतले जातील, याची खात्री आहे. अशी प्रतिक्रिया श्री तुषार भारतीय यांनी व्यक्त केली .


तुषार भारतीय मित्र परिवार त्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मा.श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचा मुख्यमंत्री पदाची शपथविधी सोहळा मुंबईस्थित आझाद मैदान येथील श्रळींश प्रेक्षपण करून ढोल ताशे , मिठाई वाटून , फटाक्यांच्या आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला . यावेळी प्रामुख्याने माजी महापौर चेतन गावंडे , प्रशांत शेंगोकर , डॉ तापडिया , भागवताचार्य अवधेशजी पांडे महाराज , सौ लता देशमुख , डॉ शोभा गायकवाड , कल्पना विघे , वंदना इंगोले , प्रदीप भागवत , विलास नायसे ,मेजर तुकाराम चांदेकर , भारत चिखलकर , सचिन मोहोड , तुषार चौधरी , सुधीर पावडे , मंदार नानोटी , शुभम वैष्णव , निरंजन दुबे , भूषण हरकूट , अंकेश गुजर , राजू नान्नोरे , हेमंत जंगले , मधू डागा , आहोक गाडे , गोपाळ दलाल , राजू मालठाने , कवल पांडे , रमेश मोहळे , अखिलेश किल्लेदार , बंडू विघे , योगेश उघडे , आशिष अडसड , अविनाश मेंटकर , संजय पंत , निकेश उंबरकर , दीपक पिंजरकर , सुरेश दहातोंडे , दिलीप अकोटकर सह अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# धारणी मध्ये भाजप कार्यकर्त्यांचा ढोल ताशे,पेढे वाटप जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धारणी-** विधानसभा निवडणूकीत रेकार्डब्रेक विजय मिळाल्यानंतर आज मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या राज्यभिषेक म्हणजे शपथविधी लाईव्ह सुरू होताच स्थानिक भाजपच्या कार्यकर्त्यांनी भाजपचे धारणी शहर अध्यक्ष श्याम गंगराडे यांच्या नेतृत्वात होली चौकात येऊन एकाच जल्लोष साजरा केला. ढोल-ताशांचा गजर, उत्साहात मिठाई वाटप व शुभेच्छांचा वर्षाव झाल्याने शहरात



सायंकाळी एक वेगळात शिवकालिन जल्लोषासारख माहौल झाला होता.जल्लोष करणाऱ्यांमध्ये भाजपचे धारणी शहर अध्यक्ष श्याम गंगराड़े, खारवे, सुधाकर फकडे, शमा चौकसे, दुर्गा बिसंदरे, मालती कास्देकर, जया खंडारे, दुबे जी, दिलीप पटेल, डॉ. अनासाने, दीपक मालवीय, रूपेश राठौड़, विपिन खरे, नितिन रायपुरे, अंकित मोहोड सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. भव्य एलईडी टीव्हीवर लाईव्ह प्रेक्षपण मुंबईतील आझाद मैदान चौकात आज ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्यासह काही मंत्र्यांचा शपतविधी सोहळा विविध न्यूज चॅलनवर लाईव्ह असल्याने भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी होली चौकात एका मोठया एलईडी टीव्हीवर शपथविधीचे लाईव्ह प्रेक्षपण पाहिले.

# 'विकसित भारतातील समृद्ध महाराष्ट्रा'चा संदेश शपथविधी सोहळ्याने दिलाराज्यसभा सदस्य- डॉ.अनिल बोंडे यांची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती :** पासपोर्टमुंबईच्या आझाद मैदानावर महायुती सरकारचे प्रतिनिधित्व करत देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. विकसित भारतातील समृद्ध महाराष्ट्राचा संदेश शपथविधी सोहळ्याच्या माध्यमातून भाजपने दिला आहे. आगामी महायुती सरकारच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात सुदृढ अर्थव्यवस्था असलेल प्रगतशील राष्ट्र म्हणून महाराष्ट्र देशात लौकिक मिळवेल, अशी प्रतिक्रिया राज्यसभा सदस्य तथा भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीच्या संदर्भात दिली आहे.

देवेंद्र फडणवीसंनी राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ तिसऱ्यांदा घेतली आहे. महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी देखील शपथ घेतली. अतिशय ऐतिहासिक, भव्य असा शपथविधी सोहळा पार पडला. यावर प्रतिक्रिया देताना खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी तेवढाच अविस्मरणीय, दैदिप्यमान ठरला. याची देही याची डोळा हा शपथविधीचा कार्यक्रम संपूर्ण देशाने पाहिला. धर्मक्षेत्र, राजकारण, अर्थक्षेत्र, समाजकारण, उद्योग, यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची या सोहळ्याला उपस्थिती होती. हा शपथविधी पाहायचं भाग्य मला लाभलं त्यासाठी मी माझं भाग्य समजतो असं देखील अनिल बोंडे यांनी स्पष्ट केलं.



देशभरातून शेकडो नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते. यातून देवाभाऊ वरील संपूर्ण देशाचे प्रेम प्रामुख्याने अधोरेखित होत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर महाराष्ट्रानं प्रेमाचा वर्षाव केला. एकंदरीतच शपथविधी सोहळ्याच्या माध्यमातून विकसित भारतातील समृद्ध महाराष्ट्राचा संदेश आज देशभरात गेला. भाजप आणि महायुतीच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात महाराष्ट्र एक सुदृढ आणि सक्षम अर्थव्यवस्था म्हणून देशात समोर येईल. गोरगरिबांचे कल्याण, महिलांचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेलं राज्य देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आकार घेतल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचा आशावाद देखील डॉ.अनिल बोंडे यांनी व्यक्त केला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली सही वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

## पुण्याच्या रुग्णाला मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई-** राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली सही मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश फाईलवर सही करून दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य करण्याची विनंती केली होती.

दरम्यान, राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नवनियुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रशासनाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

### भव्य-दिव्य शपथविधी सोहळा

आज राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांचा भव्य-दिव्य शपथविधी सोहळा पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ते तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. याशिवाय शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनीही उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी या तिघांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुंबईतील आझाद मैदानावर हा भव्य-दिव्य सोहळा पार पडला.

---

मुख्यमंत्रीण देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली

# महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल- नितीन गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर: -** महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची गुरूवारी संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर नागपूरकर देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेतली. त्यांतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देवेंद्र फडणवीसांबाबत महत्वाचे मत समाज माध्यमावर व्यक्त केले. महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विकासपुरूष अशी प्रतिमा असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दोघेही मुळ नागपूरकर आहेत. नागपूरसह राज्याच्या विकासात दोघांचीही भूमिका महत्वाची आहे. दरम्यान गुरूवारी देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी कार्यक्रमाला खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री, विविध राज्यांतील मुख्यमंत्री मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमानंतर नितीन गडकरी यांनी स्वत:च्या फेसबुक खात्यावर देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचे काही छायाचित्र पोस्ट केले. या पोस्टवर नितीन



गडकरी यांनी लिहिले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ ग्रहण केल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे हृदयपूर्वक अभिनंदन. राज्यातील यशस्वी कार्यकाळासाठी त्यांना असंख्य शुभेच्छा. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप-महायुतीला मिळालेला भव्य विजय हा खऱ्या अर्थाने सुशासन, विकास आणि महाराष्ट्राच्या समस्त जनतेचा विजय आहे. पुन्हा एकदा भाजपचा मुख्यमंत्री होताना पाहणे ही माझ्यासह समस्त भाजप कार्यकर्त्यांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. देवेंद्र फडणवीस सारखा मेहनती, कार्यकुशल, जिद्दी- चिकाटीने कार्य तडीस नेणारा आणि जमीनस्तरावर पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्याच्या रुपाने काम करत पुढे आलेला नेता महाराष्ट्राला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाईल, यात शंकाच नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या यापूर्वीच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळाली. यापुढील ५ वर्षांतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल, असा मला विश्वास आहे.

राजकारणावर मार्मिक भाष्य डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात एका कार्यक्रमात नितीन गडकरी म्हणाले होते की, राजकारणात प्रत्येकाला काही ना काही असंतोष असतो. उदाहरणार्थ, जो नगरसेवक बनला आहे, तो आमदार होण्याच्या महत्त्वाकांक्षेने दुःखी असतो. जो आमदार झाला आहे, त्याला मंत्री होण्याची इच्छा असते, आणि जो मंत्री बनला आहे, त्याला मनासारखे खाते न मिळाल्याचे दुःख असते. जो मुख्यमंत्री झाला आहे, त्याला पदावरून बाजूला व्हायची भीती असते.

---



# दोन दिवसांनी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन:

## आमदारांच्या शपथविधीचा होणार कार्यक्रम

### ९ तारखेला विधानसभा अध्यक्षांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई-** राज्यात आज महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. आता पुढच्या दोन दिवसांनी विधिमंडळाचं विशेष अधिवेशन बोलावण्यात येणार आहे. ७, ८ आणि ९ डिसेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन होणार आहे. विधानसभा अध्यक्षांची निवडणूक ९ डिसेंबरला होणार असून मंत्रिमंडळ निश्चित झाले आहे. यामध्ये फारसे बदल होणार नाहीत. हिवाळी अधिवेशनापूर्वी सर्व मंत्र्यांच्या शपथविधीनंतर खात्यांचे वाटप होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

येत्या ७ डिसेंबरला विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. विधिमंडळ सचिवालयाकडून कर्मचाऱ्यांना याबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विधिमंडळ सचिवालयाकडून सर्व कर्मचाऱ्यांना उद्या तयारीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या विशेष अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडणार आहे. हा कार्यक्रम जवळपास तीन दिवस चालण्याची शक्यता आहे.

---

# DCM म्हणजे डेडीकेटेड कॉमन मॅन

## मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करत एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई-** महायुतीचा शपथविधी झालेला आहे आणि खऱ्या अर्थाने एक ऐतिहासिक असा शपथविधी संपूर्ण महाराष्ट्र आणि देशाने पाहिला आहे. सर्वसामान्य माणसाचे सरकार आणि या राज्याला विकासाकडे घेऊन जाणारे सरकार आणि बाळासाहेबांच्या विचाराचे, सर्व लोकांना सोबत घेऊन जाणारे सरकार आणि सर्वांनी न्याय देणारे हे सरकार आहे. सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये आनंद देणारे सरकार आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



एकनाथ शिंदे म्हणाले, देशाला वैचारिक दिशा देणारे महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला मिळाली हे मी माझं भाग्य समजतो आणि खऱ्या अर्थाने गेल्या अडीच वर्षांमध्ये राज्यात आणि देशात एकाच विचाराचे सरकार असल्यामुळे केंद्र सरकारने देखील राज्याला पाठबळ दिला, भरभरून सहकार्य दिले आणि त्यासाठी या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांचे मी अभिनंदन करतो त्यांना धन्यवाद देतो. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचे हे आम्ही अभिनंदन करतो व धन्यवाद देतो.

नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धन्यवाद करतो. राजभवनमध्ये पत्रकार परिषद घेताना मी म्हणालो अडीच वर्षांपूर्वी माझे नाव त्यांनी मुख्यमंत्री म्हणून सुचवले आणि मी त्यांचे नाव यावेळेस सुचवले याचा आनंद मला आहे आणि समाधान आहे. कारण शेवटी एकत्रीत आम्ही काम केले. त्यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाचा असलेला अनुभव तो आम्हाला मिळाला आणि त्यामुळे मी त्यांना मनापासून आज शुभेच्छा देतो.

एकनाथ शिंदे म्हणाले, आधी आम्ही ४० आमदार होतो आता ५७ अधिक ३, ६० झालो. सत्ता हे जनसेवेचे साधन आहे अशा पद्धतीचे काम आम्ही केले कारण मला काय मिळाले यापेक्षा महाराष्ट्राच्या जनतेला काय मिळणार, काय मिळाले, पुढे काय मिळाणार ही भावना मनामध्ये ठेवून आम्ही काम केले. ही भावना मनात ठेवूनच आम्ही पुढेही काम करत राहू. जनतेचे सरकार जनतेसाठी. मी नेहमी कार्यकर्ता म्हणूनच काम केले आणि यापुढे देखील कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे. पदापेक्षा कामाला जास्त महत्व दिले. मी आता डीसीएम आहे डीसीएम म्हणजे डेडिकेटेड कॉमन मॅन.

---

आज महापरीनिर्वाण दिनानिमित्त शहरात

# ३० अधिकाऱ्यांसह ३५० पोलिसांचा बंदोबस्त एसआरपीफचे तीन प्लाटून व आरसीपी सज्ज

## ३५० होमगार्ड दिमतीला राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती -** आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा म्महापरीनिर्वाण दिन असल्यान सीपी रेड्डी यांना दर्शन घेणाऱ्या अनुयांना कुठलीही असुविधा होऊ नये म्हणून शहरात ३० अधिकाऱ्यांसह ३५० पोलिसांचा ऑनरोड बंदोबस्त लावला आहे. एसआरपीएफचे तीनप्लाटूनस आरसीपीचे पथक सुध्दाइर्विन चौकात तैनात राहिली. ३५० होमगार्ड सुध्दाशहर पोलिसांच्या दिमतीला राहणार आहेत. आज ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वाण असल्याने शहरातील हजारो अनुयायी इर्विन चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी येतात, तसेच शहरातील विविध प्रमुख चौकात कार्यक्रम असतात.

दिवसभर अनुयायांची शहरात वर्दळ राहत असल्याने त्यांना कुठल्याही प्रकारचीअसुविधा होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती



निर्माण होऊ नये. यासाठी सीपी नविनचंद्र रेड्डी यांनी इर्विन चौकात डीसीपी १, एसीपी २, ६ पोलिस निरिक्षक, १० पीएसआय/एपीआययांच्या नेतृत्वात ७० पोलिस, कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच इविंन चौकात एसआरपीफचे ३ प्लाटून व १ आरसीपीचे प्लाटून तैनातराहणार आहे. या व्यतिरिक्त आयुक्तालयाच्या हद्दीतील १० पोलिस ठाण्याच्या हद्दीत डीसीपी, एसीपी, पीआय, एपीआय/पीएसआय दर्जाच्या ३० अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ३५० पोलिसांचा ऑनरोड बंदोबस्त तैनात केला आहे. स्थानिक होमगार्डची ३५० जवान देखील पोलिसांच्या दिमतीला राहणार आहेत. तसेच प्रत्येक ठाण्याच्या हद्दीतील प्रमुख चौकांमध्ये फिरती गस्त, मुख्यालय, क्राईम ब्रांसह सर्वच्या ब्रांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची गस्त राहणार आहे. विशेष म्हणजे दामिनी पथक सुध्दा इर्विन चौकात तैनात राहणार आहे.

---

# विद्यापीठात साकारणार बाबासाहेबांच्या दुर्मिळ फोटोंची गॅलरी

## महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला अधिसभा सदस्य डॉ. संतोष बनसोड यांचा प्रस्ताव मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात लवकरच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र जीवन दर्शन घडवणारी गॅलरी निर्माण केली जाणार आहे. यामध्ये त्यांच्या जीवनप्रवासातील अनेक दुर्मिळ छायाचित्रांचाही समावेश असेल. विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे प्रमुख, अधिसभा सदस्य प्रा. डॉ. संतोष बनसोड यांनी दोन दिवस चाललेल्या सिनेट बैठकीत हा प्रस्ताव मांडला होता. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येलाच त्याला मान्यता मिळाल्याने या प्रस्तावाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. राज्यातील अनेक विद्यापीठांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची फोटो गॅलरी आहे. दरम्यान कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीतील या निर्णयामुळे आता अमरावती विद्यापीठही त्या विद्यापीठांच्या श्रृंखलेत दाखल होईल. शिवाय येथे येणारे विद्यार्थी, दूरवरचे व्याख्याते, दीक्षांत समारंभाचे पाहुणे



आणि इतर सर्वांना या उपक्रमाचा लाभ होणार आहे. संपूर्ण विश्वामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाला तोड नाही. ते प्रख्यात पंडित, कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, इतिहासकार, राजनीतीज्ज्ञ, मानववंशशास्त्र तथा समाज सुधारक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी भारतातील वर्णव्यवस्था तथा चातुर्वर्ण्य व्यवस्थेत बदल करून नव्या आधुनिक भारताची उभारणी केली.

दोन वर्ष ११ महिने १८ दिवस ते भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या सर्व बाबी लक्षात घेता अभ्यास केंद्राच्या सभागृहात गॅलरी स्थापन केल्यास खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याला न्याय दिला जाईल, हेही बनसोड यांनी सभागृहाला पटवून दिले. त्यामुळे सर्वांनी या प्रस्तावाला एकमुखाने मान्यता दिली.समाजाची गरज पूर्ण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुर्मिळ छायाचित्रांसह वस्तू, ग्रंथ, साहित्य, दस्तावेजांचे संग्रहालय अनेक विद्यापीठांनी निर्माण केले आहे. त्यामुळे आंबेडकरवादी अभ्यासक, साहित्यिक, संशोधक विद्यार्थी तथा डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित व्यक्तींना त्याचा लाभ होतो.

---

# अमरावतीत पहिल्यांदाच सीए संघटनेचे राष्ट्रीय अधिवेशन १४, १५ डिसेंबरला आयोजन; राजेश चांडक यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती-** चार्टर्ड अकाउंटंट असोसिएशनचे राष्ट्रीय अधिवेशन पहिल्यांदाच अमरावतीत १४, १५ डिसेंबरला होणार आहे. शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालय स्थित छत्रपती सभागृहात हे अधिवेशन होईल. महाराष्ट्र, गोवा, गुजरात आणि इतर राज्यांचे प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनाचे मुख्य समन्वयक सीए नीलेश लाठीया आणि सीए विनोद तांबी तसेच ज्येष्ठ पदाधिकारी राजेश चांडक यांनी गुरुवारी माध्यमांना ही माहिती दिली. त्यांच्या मते ही वेस्टर्न इंडिया रिजनल कॉन्फरन्स (डब्ल्यूआयआरसी) आहे. तिला अमरावतीचे प्रसिद्ध संत प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज माधान आणि अंबादेवी यांचे नाव देण्यात आले आहे. आयसीएआयचे अध्यक्ष सीए रणजितकुमार अग्रवाल आणि माजी अध्यक्ष सीए अनिकेत तलाठी व सीए जयदीप शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत १४ डिसेंबरला दुपारी १२.३० वाजता या अधिवेशनाचे उद्धाटन करण्यात येईल.दोन दिवस चालणाऱ्या अधिवेशनात सीएच्या कामकाजाबद्दलचे कायदे, या कायद्यांमध्ये नुकतेच झालेले बदल, जीएसटी लागू झाल्यानंतर बदललेली परिस्थिती आदी अनेक विषयांवर वेगवेगळ्या सत्रात चर्चा केली जाईल. अमरावती शहरात ही संघटना गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत आहे. येथे जवळपास ५०० सीए असून त्यापैकी ३०० जण सक्रियपणे कामकाज करतात. सातुर्णा स्थित कार्यालयात शिकाऊ विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र दालनही उभे करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला समन्वयक सीए राजेंद्र खंडेलवाल, सीए ब्रिजेश फाफट, सीए अनुपमा लड्ढा आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# नायलॉन मांजावर जिल्ह्यात बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** लॅस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनवलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्याचा वापर पतंग उडवण्याच्या वेळी करण्यात येतो. या घाम्यामुळे पक्षांना तसेच मानवी जीवितास तीव्र इजा होण्याचा धोका असतो.



त्यामुळे अशा घाम्यांच्या वापरास तसेच इतर वेळी नायलॉन मांज्याची धाग्यांची निर्मिती, विक्री, साठवणूक व वापर करण्यास संपूर्ण जिल्ह्यात कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली आहे. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी एक आदेश काढून अंमलबजावणीचे निर्देशही दिले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यातील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच साठवणूकदार यांना नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक करण्यास प्रतिबंध केलेआहे. पतंग उडवताना केलेल्या नायलॉन मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारा घर्षण होऊन आगीचे प्रकारही घडतात.

### आदेशाची अंमलबजावणी

यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व पोलिस विभागाने जनजागृती करावी, अशा सूचना देखील या आदेशाद्वारे करण्यात आल्या आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती, संस्था पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ मध्ये नमूद शास्तीस पात्र होणार आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व पोलिस विभागाने पथके गठीत करुन या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी त्यांच्या कार्यक्षेत्रात करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केलेल्या आदेशात दिले आहेत.-

# महापरिनिर्वाण दिन ........



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिना निमित्य स्थानिक इर्विन चौक येथे आज जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे,जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी,कर्नाटक येथील युवा आमदार प्रदीप ईश्वर ,मा.आ. यशोमती ठाकूर,माही महापौर विलास इंगोले ,बबलू शेखावत यांच्या सह हजारो अनुयायी एकत्र येत विनम्र अभिवादन केले. तर महापरिनिर्वाण दिना निमित्य काँग्रेस पक्षाच्या वतीने यशोमतीताई ठाकूर यांच्या नेतृत्वात नया अकोला येथील श्रद्धा भूमीवर अभिवादन यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रे मध्ये जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण शहर ,महिला आघाडी,युवक काँग्रेस,अनुसूचित जाती विभाग, ओबीसी विभाग,अल्पसंख्याक विभाग,सेवा दल आणि सर्व विभागांचे चे नेते ,पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार युगा युगापर्यंत पथदर्शी

### खा.डॉ.अनिल बोंडे यांचे प्रतिपादन : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना बोंडे दाम्पत्याकडून अभिवादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणून बाबासाहेबांनी या देशाला क्रांतिकारी विचार दिले, त्यांचे हे विचार युगायुगापर्यंत पथदर्शी असतील असे प्रतिपादन राज्यसभेचे सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. अनिल बोंडे व डॉ.वसुधा बोंडे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, बाबासाहेबांनी समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपार कष्ट घेतले. शोषित, पीडित, वंचित समाज घटकांचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी



विविध क्षेत्रात त्यांच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यामुळेच बाबासाहेब आज केवळ भारतातच नव्हे तर विश्वाला वंदनीय आहेत. संपूर्ण जग त्यांच्या विचारांचं आजच्या दिवशी स्मरण करत आहे. भारतरत्न, महामानव, बोधिसत्व, प्रज्ञासूर्य, घटनाकार अशा कित्येक उपाध्यांनी त्यांचा सन्मान देखील करण्यात आला आहे. त्यांच्या असीम त्याग आणि परिश्रमातून सर्वात पवित्र असलेला संविधान हा ग्रंथ आकाराला आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री पदाची शपथ घेण्यापूर्वी कपाळाला संविधान लावून संसदेत प्रवेश केला. त्यामुळे भारतीय संविधान समाजाच्या प्रत्येक घटकाला वंदनीय आहे. त्याचेच अनुकरण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने संविधान केंद्रस्थानी मानत राज्यातील विद्यापीठे, शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये संविधान शिल्प देखील उभारले आहे. शेकडो विद्यार्थ्यांना संविधान शिल्प हे प्रेरणा देत आहे, असेही त्यांनी प्रामुख्याने नमूद केलं.

## नावावर आहे जमीन, तर मिळणार 'फार्मर आयडी'

### शेतकऱ्यांना युनिक किसान आयडी नंबर मिळणार, शेतकऱ्यांची माहिती एकत्रित करणार

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

शेतकऱ्यांना आधार सारखाच एक युनिट आयडी नंबर देण्यात येणार आहे. हा युनिक आयडी देऊन सरकार शेतकऱ्यांची माहिती एकत्र करणार आहे. जर तुमच्या नावावर जमीन असेल तरच तुम्हाला 'फार्मर आयडी' मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी, गावाचे नकाशे यांच्या नोंदी डिजिटल केले जाणार आहेत. ज्यामुळे शेतकऱ्यांना सेवा आणि सुविधा त्यातून मिळू शकतील. त्यासोबतच शेतकऱ्यांसाठी डिजिटल एक प्लॅटफॉर्म सुरू करण्यात येणार आहे. त्यातून पीक संरक्षण, जमिनीचे आरोग्य आदींची माहिती एकत्र मिळेल.सध्या शेतकऱ्यांना



कृषी योजनेसाठी अर्ज करण्यापूर्वी प्रत्येकवेळी पडताळणी करावी लागते. त्यात खर्च होते. तसेच शेतकऱ्यांना संबंधित कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. कधी कागदपत्र वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना मनःस्ताप सहन करावा लागतो मात्र या 'फार्मर आयडी'मुळे शेतकऱ्यांना मनःस्ताप सहन करावा लागणार नाही.शेती क्षेत्रात डिजिटल सिस्टीम तयार झाल्यामुळे देशातील शेतकऱ्यांच्या जमिनीचा रेकॉर्ड त्यासोबत जोडला जाणार आहे. शेतकऱ्यांबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी सरकारला उपयोगी होणार आहे.शेतकऱ्यांना आपल्या शेतात कोणत्या प्रकारची पेरणी करायची? बी-बियाणे कोणते वापरायचे? कधी लागवड करायची? कापणी कधी करायची? शेतीसाठी पीक कर्ज याबाबतचे मार्गदर्शन 'फार्मर आयडी' च्या माध्यमातून करण्यात येणार आहे.यावर्षीच्या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रात डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर आणून प्रत्येक शेतकऱ्यांना युनिट आयडी देण्याचा संकल्प केला आहे.

### महसूल आणि कृषी विभागाकडे सोपविली जबाबदारी

शेतकऱ्यांना आधारकार्डसारखे स्वतंत्र ओळखपत्र वाटप करण्यात येणार आहे. यासाठी महसूल विभागाकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. १६ डिसेंबर पासून शेतकऱ्यांची माहीती गोळा करण्याचे कामजिल्यातील सर्व तालुक्यात सुरू होणार आहे.व मार्च च्या शेवटच्या आठवड्यात हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.ग्रामसेवक,तलाठी सध्या हे काम पाहत आहेत.तर ज्यांच्या नोंदणी काही कारणास्तव राहिल्यात अश्या शेतकऱ्यांना सेतू मध्ये जाऊन नोंदणी करता येईल.

### बँक, आधार, पॅनचा डेटा जोडणार

ओळखपत्र आधारशी लिंक केलेले असेल, जे शेतकऱ्यांच्या जमीन नोंदींशी जोडले जाईल. या कार्डमध्ये शेतकऱ्यांच्या वैयक्तिक माहितीबरो- बरच पेरणी केलेल्या पिकांची माहिती आणि जमिनीचा तपशील नोंदवला आहे. तसेच आधारशी लिंक केल्यामुळे बैंक डिटेल्स, पॅनचाही डेटा उपलब्ध होणार आहे.

### 'फार्मर आयडी' यासाठी ठरणार महत्त्वाचा

'फार्मर आयडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पतपु- रवठा, पीकविमा, विविध योजना आदी सेवांकरिता अर्ज करताना येणाऱ्या अडचणी यामुळे दूर होणार आहेत. ओळखपत्रातील माहितीचा फायदा शेतकऱ्यांस पीककर्ज, पीकविमा, विविध शासकीय योजनां- करिता अर्ज करताना होणार आहे. हंगामातील पीकस्थिती, पीककर्ज स्थिती, पीक सव्र्व्हे, पीक नुकसान, हवामान आधारित पीक सल्ले, योजनांची थेट माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

## ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्यराष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीच्या मुख्य कार्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

संपूर्ण भारतातील सर्व सामान्य दिन दलीत जनतेच्या पोषींदा असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले. आज ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीच्या मुख्य कार्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र आदरांजली अर्पण करण्यात आली. विशेष म्हणजे आ. रवि राणा व खा. नवनित राणा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



विचारावर चालून गोर- गरीब व सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देत असतात. यावेळी विनम्र अभिवादन करतांना प्रमुख उपस्थिती असलेले सुनिल राणा यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने विनम्र आदरांजली होय. अभिवादन करतेवेळी शैलेंद्र कस्तुरे, गणेशदास गायकवाड, आशिष गावंडे, किरण व अंबाडकर, गजानन शिंदे, बंडू डकरे, मिलींद कहाळे, राजू चुनकीकर,अवी काळे, अजय बोबडे, भिमराव गडलिंग, उमेश चुनकीकर, ज्योती सैरीसे, शोभा किटके, मंदा तायडे, रोशणी वानखडे, प्रतिभा महाजन, नंदा पाचळे, शिल्पा मोलके, भारती धर्माळे, रजनी कडू, माला खुडसुडे, बबीता अजबे अर्जुन दाते, प्रिती हिंगणकर, निरज गवई, सुधिर लवनकर, आकाश राजगुरे, मयुर अवझाडे, मुकेश गिरी, कुनाल केव्तकर, वंदना तंतरपाळे, आनंद भोयर, सुवर्णा शिंदे, निता खडसे, जीवीका पाटील, आस्था काटे, प्रयास चऱ्हाटे, प्रसाद बिसने, सुरज चेचरे, धर्मेश पारेख, मनोज ढवळे सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

